Sakal, dated 31/10/14, pg. 4

# बोधकथा

## केंब्रिजचे गुरू-शिष्य



केंब्रिज विद्यापीठाशी संबंधित एका कॉलेजचे प्राचार्य स्वतः गाडी चालवत होते. गाडीत एक पेशंट होता; भारतीय विद्यार्थी. गेले दोन आठवडे तो हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होता. आज डिस्चार्ज मिळाला होता. त्याला हॉस्टेलवर पोचविण्यासाठी स्वतः प्राचार्य गाडी घेऊन आले होते. काही दिवसांपूर्वी केंब्रिजच्या हमरस्त्यावरच त्या विद्यार्थ्याला एका स्कूटरनं धडक दिली होती. पाय फ्रॅक्चर! त्यावर तातडीनं शस्त्रक्रिया झाली व पायात स्क्रू बसवला होता. प्राचार्यांच्या पत्नीनं मागच्या सीटवर दोन-तीन उशा ठेवून त्याला काळजीपूर्वक गाडीत बसवलं. गाडी केंब्रिजकडे निघाली. दोन आठवडे बुडालेला अभ्यास कसा भरून काढायचा या चिंतेत तो गाडीत बसला होता. तेवढ्यात प्राचार्यांनी विचारलं, ''गेले दोन आठवडे तू ॲडमिट होतास नं?''

''होय.'' तो. ''तरं मग तुझे कपडे, सामान, बॅग कुठं आहे?'' प्राचार्य.

''सर, गाडीत बसताना मी माझी सूटकेस गाडीजवळच ठेवली होती,'' त्यानं सांगितलं. ''बापरे! म्हणजे तुझी सुटकेस आपण रस्त्यावरच विसरलो की काय,'' प्राचार्य जवळजवळ ओरडलेच. त्यांनी गाडी तशीच मागं वळवली. हॉस्पिटल गाठलं. दरम्यान दोन तास उलटून गेले होते. पण बॅग रस्त्यावर तिथेच होती, जशीच्या तशी! सगळ्यांचा जीव भांड्यात पडला. बॅग घेऊन पुन्हा मंडळी केंब्रिजच्या दिशेनं निघाली. आपल्या विद्यार्थ्यासाठी एवढी धावपळ करणाऱ्या त्या प्राचार्यांचं नाव डॉ. ग्रेव्ह आणि तो विद्यार्थी?

वयाच्या अवघ्या सत्ताविसाव्या वर्षी 'पद्मभूषण' झालेला भारताचा विज्ञान क्षेत्रातला कोहिनूर डॉ. जयंत नारळीकर! केंब्रिजला पोचल्यावर सर म्हणाले, ''आता अशा स्थितीत तू परीक्षेला बसणार आहेस का?'' आपल्या जखमी पायाकडे बघत जयंत म्हणाला, ''होय सर; अगदी 'एका' पायावर!'' — **प्रकाश बोकील**